साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

संपादक : विशाल वामन पाटील

पोस्ट परवाना :
KRDDN/026/2026-28

HELLO NEWS

✲ सातारा ✲ वर्ष १ ✲ अंक २० ✲ मराठी ✲ सोमवार २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ ✲ PRGI. MHMAR/26/A3624 ✲ पाने ४ ✲ किंमत ३ रुपये

✲ Satara ✲ Year 1 ✲ Volume 20 ✲ Marathi ✲ Monday 26 October to 1 November 2026 ✲ PRGI. MHMAR/26/A3624 ✲ Page 4 ✲ Price 3 Rs.

## विचारांची मेजवानी... कराडच्या इतिहासातील सुवर्णक्षण!

### ९४ वर्षांची वैचारिक परंपरा, २० हजारांहून अधिक नागरिकांची उपस्थिती आणि तरुणाईशी संवादाचा ऐतिहासिक सोहळा!



**विशाल पाटील (हॅलो न्यूज)**

कराड म्हटलं की डोळ्यांसमोर उभा राहतो तो समृद्ध राजकीय, सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा. याच परंपरेला वैचारिक अधिष्ठान देणारी कराडची शारदीय व्याख्यानमाला म्हणजे शहराच्या वैभवशाली इतिहासातील मानाचा तुरा! विचारांची देवाणघेवाण, ज्ञानाची शिदोरी आणि समाजाला दिशा देणाऱ्या व्याख्यानांची परंपरा जपणाऱ्या या व्याख्यानमालेने यंदा ९४ वर्षांचा टप्पा गाठला आहे. शंभरीकडे वाटचाल करणाऱ्या या वैचारिक चळवळीने यंदा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद व्हावी, असा क्षण अनुभवला.

पुण्याला जशी विचारांची मेजवानी देणारे शहर म्हणून ओळख आहे, तशीच महाराष्ट्राला वैचारिक खाद्य पुरवणारे शहर म्हणून कराडची ओळख अधिक ठळक होत आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या तरुणाईशी संवाद या कार्यक्रमाला २० हजारांहून अधिक कराडकर नागरिकांनी लावलेली उपस्थिती ही केवळ गर्दी नव्हती, तर विचारांप्रती असलेली आस्था, जिज्ञासा आणि ज्ञानाची भूक यांचे दर्शन होते. या अभूतपूर्व प्रतिसादाने व्याख्यानमालेच्या आजवरच्या गर्दीचे विक्रम मोडीत निघाले आणि कराडच्या वैचारिक परंपरेने नवा इतिहास घडवला.

आजच्या वेगवान आणि धावपळीच्या जीवनात मनोरंजनाच्या असंख्य पर्यायांमध्ये विचार ऐकण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि आत्मचिंतनासाठी हजारोंच्या संख्येने एकत्र येणारा जनसमुदाय ही कराडच्या सांस्कृतिक समृद्धीची खरी ओळख आहे. तुकाराम मुंढे यांच्या संवादाने तरुणाईला विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि स्वतःची दिशा ठरवण्याची प्रेरणा दिली. या व्याख्यानाने हेही अधोरेखित केले की, समाजाला केवळ मनोरंजनाची नव्हे, तर प्रेरणादायी विचारांचीही तितकीच गरज आहे.

या ऐतिहासिक सोहळ्याच्या यशात कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष घनश्याम ऊर्फ पोपटराव साळुंखे, विरोधी पक्षनेते विजय वाटेगांवकर, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांच्यासह सर्व नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी आणि पडद्यामागे मेहनत घेणाऱ्या प्रत्येक हाताचा मोलाचा वाटा आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांपासून नियोजनात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे योगदान या यशामागे उभे आहे. कारण अशा वैचारिक सोहळ्याचे यश केवळ व्यासपीठावर घडत नाही, तर त्यासाठी अनेक हातांची मेहनत आणि मनांची एकजूट आवश्यक असते.

आता शारदीय व्याख्यानमालेची वाटचाल शतकपूर्तीकडे सुरू आहे. या प्रवासात कराडच्या सीमा ओलांडून राज्यातील साहित्यिक, विचारवंत, अभ्यासक आणि नागरिकांनी या व्यासपीठाला आवर्जून भेट द्यावी, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे. एकदा तरी कराडच्या शारदीय व्याख्यानमालेचा अनुभव घ्यावा, अशी ओढ निर्माण होणे, हेच तिच्या यशाचे खरे फलित ठरेल.

९४ वर्षांची परंपरा, विचारांचा अखंड प्रवाह आणि हजारो मनांना स्पर्श करणारा संवाद! कराडच्या शारदीय व्याख्यानमालेने यंदा केवळ गर्दीचा विक्रम केला नाही, तर शहराच्या वैचारिक सामर्थ्याची ताकदही जगासमोर आणली. शंभरीच्या उंबरठ्याकडे वाटचाल करणाऱ्या या ज्ञानयज्ञाचा प्रत्येक कराडकराला अभिमान वाटावा, असा हा खरोखरच इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे!

## दांभिकता सोडून नैतिकतेचा मार्ग धरा!

### आयुक्त तुकाराम मुंढे यांचे तरुणाईला आवाहन; व्याख्यानमालेचे सातवे पुष्प, यशवंतराव चव्हाणांच्या विचारांचा महाराष्ट्र घडवण्याचा संदेश





**कराड (हॅलो न्यूज)**

अन्याय होत असताना आपण विरोधाची भूमिका घेत नाही. दुसऱ्याने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा ठेवतो. ही मानसिकता बदलायची असेल, तर स्वतःपासून सुरुवात करा. दांभिकता सोडून नैतिकतेचा मार्ग स्वीकारा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवा, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेतील सातवे पुष्प गुंफताना तरुणाईशी संवाद या विषयावर ते बोलत होते. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, प्रा. बी. एस. खोत यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, नगरपालिका व नगरवाचनालयाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्रीपद भूषवले. देशाचे संरक्षण मंत्री म्हणून नवा इतिहास लिहिला. सहकार चळवळ, औद्योगिक विकास, शिक्षणाचा विस्तार, पंचायतराज व्यवस्था, कृषी आणि सिंचन क्षेत्रातील योगदानातून त्यांनी समाजाला विकासाची दिशा दिली. त्यांच्या विचारांचा महाराष्ट्र घडवायचा असेल, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि सामाजिक परिवर्तनासाठी काम करण्याची तयारी तरुणांनी ठेवली पाहिजे, असे मुंढे यांनी सांगितले.

द्रौपदीच्या वस्त्रहरणावेळी सभेत उपस्थित असलेल्या जबाबदार व्यक्तींनी विरोध केला नाही. आजही अन्याय आणि अत्याचाराच्या घटनांवेळी समाजाची भूमिका अनेकदा निष्क्रिय असते. ही परिस्थिती बदलण्यासाठी देव-दानवाच्या संकल्पनांपलीकडे जाऊन माणूस म्हणून जगणे आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी स्वीकारणे गरजेचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



१५ ऑगस्ट २०४७ रोजी देशाच्या स्वातंत्र्याला शंभर वर्षे पूर्ण होतील. त्यावेळी भारत आणि महाराष्ट्र कसा असावा, याचा विचार तरुणांनी आतापासून करायला हवा. चांगल्या व्यवस्था आणि व्यक्तींची अपेक्षा करताना आपण स्वतः कृती करीत नसू, तर परिवर्तन घडणार नाही. केवळ दुसऱ्याच्या पुढाकाराची वाट पाहण्यात आयुष्य निघून जाते, असे सांगत त्यांनी तरुणाईला कृतीशील होण्याचे आवाहन केले.

**स्पर्धा परीक्षा समाजसेवेचे साधन**

स्पर्धा परीक्षा ही केवळ नोकरी मिळवण्याची संधी नसून, समाजाप्रती जबाबदारी पार पाडण्याचे साधन आहे. सार्वजनिक सेवेत येणाऱ्यांनी ती भूमिका निभावण्याची तयारी ठेवली पाहिजे. पैसे कमावणे हेच उद्दिष्ट असेल, तर त्यासाठी शेती, उद्योग आणि व्यवसायाचे पर्याय आहेत. प्रामाणिकपणा, नैतिकता आणि अनैतिकता यांची किंमत प्रत्येकाला मोजावी लागते; त्यापैकी कोणता मार्ग निवडायचा, हे प्रत्येकाने ठरवावे, असे मुंढे यांनी स्पष्ट केले.

**स्मृतिसदनात गर्दीचा विक्रम!**

कराडमधील यशवंतराव चव्हाण स्मृतिसदनातील व्याख्यानाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. सभागृहासह समोरील व पश्चिमेकडील मैदान आणि दुसऱ्या मजल्यावरील हॉलही गर्दीने फुलला. हजारो कराडकरांच्या या उत्स्फूर्त उपस्थितीने स्मृतिसदनाच्या इतिहासात गर्दीचा नवा विक्रम नोंदवला गेला. या प्रतिसादाने आयुक्त तुकाराम मुंढेही भारावून गेले.

**मुंढेंसोबत सेल्फीसाठी ‘जेन झी’ची झुंबड!**

व्याख्यानानंतर तुकाराम मुंढे यांच्यासोबत सेल्फी घेण्यासाठी युवकांनी गर्दी केली. मुंढे यांनीही स्वतः युवकांचे मोबाईल हातात घेत सेल्फी आणि व्हिडिओ काढले. त्यांच्या आगमनावेळीही जल्लोषात स्वागत झाले. पावसाची हलकी सर कोसळूनही श्रोते जागेवर ठाम राहिले. मुंढेंच्या लोकप्रियतेची आणि जनमानसावरील प्रभावाची ही प्रचिती ठरली.

नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी, ९४ वर्षांच्या व्याख्यानमालेतून विचारपरिवर्तनाची परंपरा सुरू असल्याचे नमूद केले. उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे यांनी, मुंढे यांच्या प्रशासकीय कार्याचा परिचय करून दिला. आनंद कलबुर्गी यांनी, त्यांच्यावर लिहिलेली कविता सादर केली. नगरसेवक प्रवीण पवार यांनी आभार मानले.

## संपादकीय

# विद्वेषाने दुभंगलेला समाज

धर्म, जात, प्रांत, भाषा, वंश अशा विविधतेने नटलेल्या आपल्या देशातील लोकांमध्ये संविधानाने समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांसोबत लोकशाही, धर्मनिरपेक्षता ही मूल्येही रुजविली. परिणामी विविधतेतून एकता हे सार्थ बिरुद आपण अभिमानाने मिरवू शकत होतो. परंतु १२ वर्षांपूर्वी धार्मिक विद्वेषाच्या आधारे मतांचे ध्रुवीकरण करून हिंदुत्ववादी सरकार सत्तेत आले. तेव्हापासून या संवैधानिक मूल्यांना सरकारच्या आशीर्वादाने पद्धतशीरपणे मूठमाती दिली जात असल्याचे विदारक चित्र दिसत आहे. धार्मिक असहिष्णुता आणि विद्वेषाने जे भयाण स्वरूप धारण केले आहे ते पाहून देशातील संवेदनशील, शांतताप्रेमी, देशप्रेमी नागरिक अस्वस्थ झालेला आहे. हा विद्वेष धर्माच्या सीमा ओलांडून जात, भाषा, प्रांत, राजकीय निष्ठा यामध्ये झिरपला आहे. या विद्वेषाने समाजमन दुभंगले आहे. परिणामी, देशातील सामाजिक सलोखा, ऐक्य आणि एकात्मता धोक्यात येत आहे. म्हणून, त्यावर एक दृष्टिक्षेप टाकणे आणि गंभीरपणे विचार करणे आवश्यक ठरते.

विद्वेष पसरवण्यासाठी लोकांना विरोधकांची किळस येईल, भीती वाटेल, त्यांचा राग येईल असे काहीतरी बनावट नरेटीव्ह तयार करून ते लोकांच्या गळी उतरवायचे, अशी ही मोडस ऑपरेंडी आहे. याचाच एक भाग म्हणजे हिंदू धर्म (हल्ली, सनातन धर्म) धोक्यात असल्याची आवई उठवून मुसलमानांविषयी विद्वेष पसरवणे. विशेष म्हणजे सुमारे सात-आठशे वर्षे गैर-हिंदू (मुस्लिम-मोगल-ब्रिटिश) राजवटीत हा धर्म पूर्ण सुरक्षित राहिलेला आहे. हा विद्वेष आधी कुजबूज मोहिमेतून पसरवला जायचा. पण त्यांची सत्ता आल्यावर या विद्वेषी लोकांची हिंमत वाढली असून त्यांचा भेसूर चेहरा वेळोवेळी उघडपणे समोर येत आहे. त्याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे सत्ताधारी पक्षाच्या एका नेत्याने गरब्याच्या बाबतीत काढलेला फतवा. लव्ह जिहाद आणि गैर-हिंदूंचा गरब्यात प्रवेश रोखण्यासाठी, पर्यायाने सनातन धर्माचे रक्षण करण्यासाठी, गरब्यात गोमूत्रमिश्रित कुंकवाचा टिळा लावल्यावरच प्रवेश देणे, आधार कार्ड तपासणे, मंडपाच्या बाहेर भगवान वराहाचे कटआऊट लावणे, असे या फतव्याचे स्वरूप आहे.

वास्तविक गेल्या काही वर्षांमध्ये गरबा हा फक्त गुजरात्यांचा एक धार्मिक उत्सव राहिला नसून त्यास कॉस्मोपोलिटन, व्यापारी स्वरूप प्राप्त झाल्याने विविध जाती-धर्मांचे लोक त्यात सहभागी होत असत. तेव्हा सनातन धर्म कधीही धोक्यात आला नव्हता. परंतु हिंदुत्ववादी सरकार सत्तेत आल्यापासून मात्र मुसलमानांच्या गरब्यात येण्याने सनातन धर्म धोक्यात येत असल्याचा साक्षात्कार धर्मरक्षकांना झालेला दिसतो आहे. त्यातून गैर-हिंदूंना गरब्यापासून दूर ठेवण्याचे खूळ पुढे आले असले तरी लव्ह जिहाद किंवा भगवान वराह कटआऊट हे प्रकार फक्त मुसलमानांना लक्ष्य करणारे, त्यांच्याविषयी विद्वेष व्यक्त करणारे आहेत हे सांगायला तज्ज्ञांची गरज नाही. कारण मुसलमान लोक डुकरास अपवित्र मानतात, म्हणून ते भगवान वराह दिसताच गरबा मंडपापासून दूर पळतील अशा यांच्या भाबड्या आणि सोयीस्कर समजावर कोणीही सुज्ञ माणूस विश्वास ठेवणार नाही. चिंताजनक बाब म्हणजे अहिंसा परमो धर्म हे तत्त्व पाळणाऱ्या आणि जगातील सर्वात अहिंसक धर्म म्हणून मानल्या गेलेल्या जैन (गैर-हिंदू) धर्माचे एक मुनी नीलेश चंद्र यांनी यात उडी घेतली असून, गरब्यामध्ये इतर धर्माचा कुणी दिसला, तर तलवार उपसा त्याला तिथेच झोडा... आणि मातेला बळी दिला असे समजा, असे वादग्रस्त वक्तव्य केले आहे. सनातन धर्मरक्षक, मुसलमानांना (खरे तर जैनांसकट अन्य धर्मीयांना) गरब्यापासून निदान दूर तरी ठेवतात. पण हे जैन मुनी मात्र थेट त्यांच्या कत्तलीचीच भाषा करताहेत, हे अत्यंत धक्कादायक असून धार्मिक विद्वेषाने किती भयावह पातळी गाठली आहे हे दर्शविणारे आहे.

आज परिस्थिती अशी आहे की हा विद्वेष सर्वत्र दिसत आहे. पुण्यातील जुने खोले बाई प्रकरण असो, उत्तर प्रदेशातील इटावा येथे यादवांनी पूजा केली म्हणून त्यांना मारहाण करून शेंडी कापण्याचे प्रकरण असो, हा जाती आधारित विद्वेष सर्वत्र वाढत आहे. मराठा विरुद्ध धनगर विरुद्ध ओबीसी यांच्यातील वाद पराकोटीला पोहोचले आहेत. उपवर्गीकरणावरून मातंग विरुद्ध बौद्ध-महार यांच्यातील द्वंद्वाने ओंगळवाणे स्वरूप धारण केले आहे. एकदा विद्वेष करायचे ठरवले की त्यासाठी समोरच्याला प्रचंड राग येईल अशी अत्यंत खालच्या पातळीवरील भाषा त्याच्याविषयी किंवा त्याच्या नेत्यांविषयी वापरणे आलेच. त्याबाबतीत सर्वत्र चढाओढ लागलेली दिसत आहे.

# कराड, मलकापूरसह ग्रामीण भागात धनसंपत्ती नागरी सहकारी पतसंस्था संजीवनी देईल : अध्यक्ष दत्ताराम देशमुख

**मलकापूर (हॅलो न्यूज)**

माणसाच्या जीवनात सुख, शांती आणि धनसंपत्ती असल्यास जीवन पूर्णत्वाकडे गेल्याचा आनंद मिळत असतो. आज विश्वासार्ह गुंतवणूक व ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी कराड, मलकापूर शहरासह ग्रामीण भागातील अर्थवाहीनीला संजीवनी देण्यासाठी धनसंपत्ती नागरी सहकारी पतसंस्था काम करेल, असा विश्वास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दत्ताराम देशमुख यांनी व्यक्त केला.

कराड तालुक्यातील मलकापूर-आगाशिवनगर येथे धनसंपत्ती नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित मलकापूरचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी संस्थापक अध्यक्ष दत्ताराम देशमुख बोलत होते. यावेळी




संचालक संदीप सावंत, रणजीत पवार, विश्वास देसाई, प्रतीक्षा देसाई, अर्चना देशमुख, शुभांगी सावंत, प्रियांका पवार, अश्विनी सावंत यांच्यासह संस्थेचे कर्मचारी व ठेवीदार, हितचिंतक उपस्थित होते.

संचालक संदीप सावंत म्हणाले, व्यवसाय असो की दैनंदिन गरज प्रत्येला पैशाची, धनाची गरज असते. आपली धनसंपत्ती सुरक्षित ठेवण्यासाठी आणि आपल्याला धनसंपत्ती मिळावी, यासाठी सेवा पुरवण्यासाठी धनसंपत्ती पतसंस्था यापुढील काळात कार्यरत राहील.

# प्रा. श्री. अथर्व बागाडे यांचा आंतरराष्ट्रीय कृषी परिसंवाद संशोधनासाठी निवड

## मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविराज देसाई दादां यांच्या शुभ हस्ते सत्कार; लोकनेते बाळासाहेब देसाई कृषी महाविद्यालय दौलतनगर या कृषी महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**पाटण (हॅलो न्यूज)**

लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना दौलतनगर संचलित,लोकनेते बाळासाहेब देसाई कृषी महाविद्यालय, दौलतनगर, या कृषी महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून श्री.अथर्व बागाडे यांची संशोधन सारांशाची तिसऱ्या आंतरराष्ट्रीय ISCAR परिसंवादासाठी निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचा आज मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविराज देसाई दादा यांच्या शुभ हस्ते शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

प्रा. श्री. अथर्व बागाडे यांनी आपल्या संशोधनामध्ये Climate-Smart Agriculture for Resilient Farming Systems: Adaptation and Mitigation Strategies in Semi-Arid Maharashtra, India हा विषय असून

या कृषी संशोधन क्षेत्राशी संबंधित संस्थेच्या आंतरराष्ट्रीय परिसंवादासाठी संशोधन सारांशाची निवड होणे ही महाविद्यालयासाठी



अभिमानाची बाब आहे. या यशामुळे कृषी शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील योगदानाला आंतरराष्ट्रीय व्यासपीठ मिळण्याची संधी निर्माण झाली आहे.

या अभूतपूर्व यशाबद्दल त्यांचेमहाराष्ट्र राज्याचे पर्यटन, खनीकर्म माजी सैनिक कल्याण मंत्री तथा सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. नामदार श्री. शंभूराज देसाई साहेब, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविराज देसाई दादा लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा. श्री. यशराज देसाई दादा, युवा नेते ॲड. जयराज देसाई दादा, मा. आदित्यराज देसाई दादा, लोकनेते बाळासाहेब देसाई फौंडेशनचे सचिव श्री. एन. एस. कुंभार, प्राचार्य डॉ. सचिन शिंदे, लोकनेते बाळासाहेब देसाई शिक्षण संकुलातील सर्व शाखांचे मुख्याध्यापक ,प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी वर्ग, आजी माजी विद्यार्थी, यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



# श्रीयांश फणसाळकरची राज्यस्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड

**कराड (हॅलो न्यूज)**

रयत शिक्षण संस्थेच्या, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराडमधील श्रीयांश निलेश फणसाळकर इ.विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दि. १९ व २० ऑक्टोबर, २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, सांगली याठिकाणी संपन्न झालेल्या कोल्हापूर विभागीय शालेय शासकीय बॅडमिंटन स्पर्धेत महाविद्यालयातील १९ वर्षाखालील खेळाडू श्रीयांश निलेश फणसाळकर- इ. १२ वी कला याने प्रथम क्रमांक पटकाविला. त्याच्या यशस्वी कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

त्याच्या निवडीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड. रवींद्र भाऊ पवार, ज्युनिअर कॉलेजचे प्रमुख प्रा. हणमंतराव मांडके, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य प्रा.डॉ. उत्तम मोरे तसेच कला शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. रामचंद्र व्हनबट्टे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य प्रा. माधुरी कांबळे मॅडम तसेच महाविद्यालयातील सिनिअर ज्युनिअर सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. डॉ. विद्या पाटील, प्रा. सचिन चव्हाण, प्रा. अमित पोळ, प्रा. रणजीत पाटोळे या सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

# युवापिढीने जीवनात यशस्वी होण्यासाठी कठीण प्रवास व कष्टाची तयारी ठेवावी : आ. डॉ. अतुलबाबा भोसले

**कराड (हॅलो न्यूज)**

युवापिढीने आयुष्यात मिळालेल्या प्रत्येक संधीचे सोने करण्यासाठी मेहनत घेणे आवश्यक आहे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर कठीण प्रवासाची आणि कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी केले. कृष्णा विश्व विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लिमिटेडच्यावतीने आयोजित भव्य भरती मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यात तब्बल १३६५ युवक-युवतींनी सहभाग नोंदविला असून, सुमारे ४०० जणांना नोकरीची सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे.

जयवंत इंजिनिअरिंग कॉलेज, कृष्णा फाउंडेशन आणि कृष्णा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या भरती मेळाव्याचे उद्घाटन आमदार डॉ. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त विनायक भोसले, कृष्णा विद्यापीठाचे उपकुलसचिव एस. ए. माशाळकर, सहाय्यक कुलसचिव अस्मिता देशपांडे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सल्लागार डॉ. विनोद बाबर, जयवंत इंजिनिअरिंग




कॉलेजचे प्राचार्य डॉ. अनंत गुजर, टाटा ऑटोकॉम्पचे एच.आर. मॅनेजर विकास सूर्यवंशी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार डॉ. भोसले म्हणाले, की कराड भागातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी टाटा समूहाने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. येत्या काळात टाटा समूहाला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ या भागातून उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. तसेच स्थानिक युवकांना मोठ्या औद्योगिक समूहांमध्ये काम करण्याची संधी मिळावी, त्यांना योग्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठीही विशेष प्रयत्न केले जातील.

कृष्णा विद्यापीठाचे असिस्टंट एच.आर. मॅनेजर चेतन गोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुन, उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला कृष्णा विद्यापीठाचे एच. आर. मॅनेजर विक्रम शिंदे, टाटा टोयो रेडिएटरच्या पुष्पांजली धापले, टाटा समूहातील विशाल आहेर, शुभम गराडे, कृत्तिक भादुरी, महेश कोळसे, श्रेयस धोंगडे, श्रीराम बदाणे, विक्रम यादव, विपुल पाटील, प्रवीण मोहिते, रुपेश शिबदे, विजय पडवळ, योगेश तणपुरे यांच्यासह युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

* Satara * Vol- 20 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# अहंकार सोडा, आनंदाची दारे खुली होतील! : युवराज पाटील

## ‘आनंदाचा पासवर्ड’ विषयावर पाचवे पुष्प, अतिरिक्त ज्ञान दुःखाचे मूळ कारण

**कराड (हॅलो न्यूज)**

पैसा, पद आणि प्रतिष्ठा मिळवूनही माणसाला खरा आनंद मिळेलच असे नाही. दुसऱ्यांशी तुलना आणि अहंकारामुळे मनातील समाधान हरवते. त्यामुळे अहंकाराचा त्याग, वर्तमानाचा स्वीकार आणि नात्यांमधील प्रेम व जिव्हाळा जपणे, हाच आनंदी जीवनाचा खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते युवराज पाटील यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत आनंदाचा पासवर्ड या विषयावरील पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, माजी नगरसेवक सौरभ पाटील व गंगाधर जाधव, प्रा. बी. एस. खोत, राजीव अपिणे, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे आणि माजी ग्रंथपाल संजय शिंदे उपस्थित होते.

परिस्थितीकडे सकारात्मकतेने पाहायला शिकले पाहिजे. घटना बदलता येत नसली, तरी तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलता येतो. संघर्ष आणि संकटांचा सामना करण्यासाठी संयम आवश्यक आहे, असे पाटील यांनी सांगितले.

वस्तू, पैसा आणि पद यांच्यापेक्षा इतरांना काही देण्यातून अधिक आनंद मिळतो. गरजा आणि प्राधान्यक्रम निश्चित करणे महत्त्वाचे असून, इतरांशी तुलना करणे दुःखाचे मूळ ठरते. भूतकाळाच्या आठवणी आणि भविष्याची चिंता सोडून वर्तमानात जगल्यास खऱ्या आनंदाची जाणीव होते, असे त्यांनी स्पष्ट केले.

मान्यवरांचा परिचय सुवर्णा विभुते यांनी करून दिला. सूत्रसंचालन विजया पवार यांनी केले, तर अनिल थोरात यांनी आभार मानले. कार्यक्रमास महिला व नागरिकांची मोठी गर्दी होती.



**लोक काय म्हणतील? हा विचार सोडा!**

पती-पत्नीच्या नात्यात परस्परांना समजून घेणे, प्रेम व्यक्त करणे आणि संयम राखणे महत्त्वाचे आहे. तसेच लोक काय म्हणतील? या भीतीपोटी स्वतःची स्वप्ने आणि आवडीनिवडी दडपून टाकू नयेत. समाजाच्या अपेक्षांच्या ओझ्याखाली स्वतःचे जगणे हरवू नका. इतरांच्या मतांपेक्षा अंतर्मनाचा आवाज महत्त्वाचा मानून आत्मविश्वासाने आयुष्य सुंदर बनवा, असा संदेश युवराज पाटील यांनी दिला.

# ‘सुरक्षा पासवर्ड’च उत्तम सायबर कवच! : डॉ. धनंजय देशपांडे

## डिजिटल अरेस्ट, हनी ट्रॅप आणि एआयच्या माध्यमातून फसवणुकीचे वाढते धोके

**कराड (हॅलो न्यूज)**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) मदतीने एखाद्याचा आवाज आणि चेहरा हुबेहूब बनवून आर्थिक व सामाजिक फसवणूक केली जात आहे. अशा वेळी कुटुंबातील सदस्यांनी रोजचा एक गुप्त संकेत निश्चित करून संकटाच्या प्रसंगी त्याद्वारे संबंधित व्यक्तीची खात्री करावी. हा सुरक्षा पासवर्ड फसवणूक टाळण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो, असे प्रतिपादन सायबर तज्ज्ञ डॉ. धनंजय देशपांडे यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत सायबर क्राईमचा धोका वेळीच ओळखा या विषयावरील सहावे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, नगरसेविका नीलम कदम, माजी नगरसेवक सौरभ पाटील व राजेंद्र तोडकर, नगरपालिकेचे कार्यालयीन अधीक्षक अमोल जाधव, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे आणि माजी ग्रंथपाल संजय शिंदे उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गडाचे दरवाजे ठरावीक संकेताची खात्री केल्यानंतरच उघडले जात. त्याच धर्तीवर कुटुंबानेही गुप्त संकेत ठरवावा. अपघात, रुग्णालय किंवा कायदेशीर अडचणीचे कारण सांगून नातेवाइकाच्या आवाजात फोन अथवा व्हिडिओ कॉल आल्यास घाईने पैसे पाठवू नयेत. आधी संकेताद्वारे खात्री करावी, असे त्यांनी सांगितले. डिजिटल अरेस्टमध्ये पोलिस किंवा तपास यंत्रणेचे अधिकारी असल्याचे भासवून तस्करी अथवा घोटाळ्याशी संबंध असल्याची भीती दाखवली जाते. व्हिडिओ कॉलवर चौकशी करून पैशांची मागणी केली जाते. हनी ट्रॅपमध्ये भावनिक जवळीक निर्माण करून किंवा अश्लील व्हिडिओच्या माध्यमातून बदनामीची धमकी देत खंडणी उकळली जाते. अशा वेळी घाबरून न जाता कुटुंबीय आणि पोलिसांशी संवाद साधावा. अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारणे आणि संशयास्पद व्हिडिओ कॉल घेणे टाळावे, असे आवाहन त्यांनी केले.

अनिल थोरात यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यक्रमास महिला, नागरिक, युवकांची मोठी गर्दी होती.



**सायबर क्षेत्रात रोजगाराच्या संधी**

श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना डॉ. देशपांडे यांनी, सायबर क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी असल्याचे सांगितले. मात्र, या क्षेत्रात आपत्कालीन परिस्थितीत तातडीने काम करावे लागते. ईव्हीएम हॅकिंगविषयीच्या प्रश्नावर त्यांनी मशीनपेक्षा त्या हाताळणाऱ्या व्यक्तींच्या भूमिकेबाबत चिंता व्यक्त केली.

# संपत्तीपेक्षा नात्यांची श्रीमंती महत्त्वाची : प्रा. डॉ. सुरज चौगुले

## शारदीय व्याख्यानमालेचे आठवे पुष्प; नात्यांची वीण घट्ट करण्याचे आवाहन

**कराड (हॅलो न्यूज)**

घराचे खरे सौंदर्य सुखसोयींत नव्हे, तर माणसांमधील प्रेम, आपुलकी आणि सुसंवादात असते. संपत्तीच्या हव्यासापोटी नाती दुरावत असताना माणुसकीचा ओलावा जपून प्रत्येक क्षण आनंदाने जगा, असे आवाहन प्रसिद्ध व्याख्याते प्रा. डॉ. सुरज चौगुले यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत घराला घरपण देणारी नाती या विषयावर आठवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, नगरसेविका नीलम कदम, प्रा. बी. एस. खोत, डॉ. बनकर, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे आणि माजी ग्रंथपाल संजय शिंदे उपस्थित होते.

प्रा. डॉ. चौगुले म्हणाले, कोणत्या घरात किंवा जाती-धर्मात जन्म घ्यावा, हे आपल्या हातात नसते; मात्र माणूस म्हणून कसे जगायचे, हे आपल्या हातात असते. आज माणूस नात्यांपेक्षा वस्तूंवर अधिक प्रेम करू लागला आहे. परस्परांतील संवाद कमी झाला असून, अहंकार आणि संपत्तीच्या हव्यासामुळे नात्यांमध्ये दुरावा निर्माण होत आहे. त्यामुळे प्रत्येकाने नात्यांमधील प्रेम, आदर आणि विश्वास जपला पाहिजे.

जन्माची चाहूल नऊ महिने आधी लागते; मात्र मृत्यूची चाहूल नऊ सेकंद आधीही मिळत नाही. जन्मानंतर आई-वडिलांपासून सुरू होणारा नात्यांचा प्रवास आयुष्य समृद्ध करतो. या नात्यांची गुंफण समजून घेऊन ती जपणे आवश्यक आहे. माणसाचे आयुष्य सुस्त, त्रस्त, व्यस्त, स्वस्त आणि मस्त अशा अवस्थांतून जात असते. मात्र, परिस्थिती कोणतीही असली, तरी आयुष्य आनंदाने जगण्याची वृत्ती अंगी बाळगली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

श्रीनिवास पाटील यांनी, जुन्या पिढ्या म्हणजे ज्ञान, संस्कार आणि अनुभवांचा भांडार आहेत; नव्या पिढीने हा वारसा जपावा. नात्यानात्यांतील प्रेम वाढवून भोवतालची प्रत्येक नाती भावनिकतेने जपली पाहिजेत. नाती दुधावरच्या सायीसारखी आणि भाकरीच्या पापुद्र्यासारखी जिव्हाळ्याची असावीत, असे मत व्यक्त केले.

मान्यवरांचा परिचय सहाय्यक ग्रंथपाल सायली फल्ले यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. सौ. विजया पवार यांनी केले, तर अनिल थोरात यांनी आभार मानले. कार्यक्रमास महिला, नागरिक, ज्येष्ठ नागरिकांची मोठी गर्दी होती.



**...हीच खरी जीवन जगण्याची कला**

पैसा, पद आणि प्रतिष्ठा मृत्यू टाळू शकत नाहीत. त्यामुळे आयुष्याच्या अखेरच्या क्षणाची वाट न पाहता प्रत्येक दिवस आनंदाने जगला पाहिजे. विस्कटलेली नाती पुन्हा जोडून त्यातील प्रेम, आपुलकी आणि विश्वास जपला पाहिजे. नात्यांमधील आनंद टिकवून ठेवणे, हीच खऱ्या अर्थाने जीवन जगण्याची कला आहे, असे प्रा. डॉ. चौगुले यांनी सांगितले.



# कवी-साहित्यिकांनी समाजभान जपावे : डॉ. स्वप्निल चौधरी

## व्याख्यानमालेचे नववे पुष्प, कवितेतून राजकारण, स्त्री-सन्मान, शेतकरी व सामाजिक वास्तवावर परखड भाष्य

**कराड (हॅलो न्यूज)**

समाजातील अनिष्ट प्रवृत्तींवर प्रहार करून राज्यकर्त्यांना आत्मपरीक्षणास भाग पाडण्याचे काम कवी आणि साहित्यिक करतात. राजकारणाची घसरत चाललेली पातळी, सामाजिक भेदभाव आणि संवेदनशीलतेचा अभाव यांसारख्या प्रश्नांवर साहित्यिकांनी परखडपणे व्यक्त होणे आवश्यक आहे. जिवंत आणि सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी कवी-साहित्यिकांनी आपली लेखणी जागृत ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी डॉ. स्वप्निल चौधरी यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेतील नववे पुष्प कवितेच्या निमित्ताने या विषयावर गुंफताना ते बोलत होते. यावेळी माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, नगरसेविका नीलम कदम, माजी नगरसेवक सौरभ पाटील, प्रा. बी. एस. खोत, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे आणि माजी ग्रंथपाल संजय शिंदे उपस्थित होते.

कवितेचा उगम सामान्य माणसाच्या जगण्यातून होतो. जात्यावरील ओव्या, लोकगीते आणि स्त्रियांच्या अनुभवांतून समाजाचे वास्तव व्यक्त होत आले आहे. बहिणाबाईंच्या कवितांचा संदर्भ देत डॉ. चौधरी यांनी, लोकजीवन आणि साहित्य यांच्यातील नाते उलगडले. समाजातील विसंगतींवर बोट ठेवत अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, हे कवीचे महत्त्वाचे कर्तव्य असल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौरभ पाटील यांनी करून दिला. तर सूत्रसंचालन करून अनिल थोरात यांनी आभार मानले. कार्यक्रमास महिला, नागरिक, ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.

# सामाजिक पापे हा नैतिकतेचा आरसा : कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के

## ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेचे पहिले पुष्प, विज्ञानाचा विनाशकारी वापर गंभीर धोका



**कराड (हॅलो न्यूज)**
कष्टांशिवाय संपत्ती, तत्त्वांशिवाय राजकारण आणि मानवतेशिवाय विज्ञान ही समाजाच्या नैतिक अध:पतनाची लक्षणे आहेत. सामाजिक पापे हा नैतिकतेचा आरसा असून, समाजात नैतिकता टिकवण्यासाठी विवेक, मानवता आणि नीतिमूल्ये आचरणात आणणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या वतीने येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेतील पहिल्या पुष्पात समाज आणि नैतिकता : आजची वास्तवता या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील होते. उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर, स्थायी समिती सदस्य तथा माजी नगराध्यक्ष अल्ताफ शिकलगार, निधी व विकास समितीच्या सदस्या नीलम कदम, प्रा. बी. एस. खोत आदी उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वरांच्या कार्याचा संदर्भ देताना डॉ. म्हस्के म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीतही संत ज्ञानेश्वरांनी समाजमन घडविण्याचे काम केले. रूढी, बहिष्कार आणि सामाजिक विषमता यांचा सामना करत त्यांनी ज्ञानाचा आणि मानवतेचा विचार समाजापुढे मांडला. वंचित घटकांना सन्मान देण्याची त्यांची भूमिका सामाजिक नैतिकतेचा महत्त्वाचा आधार ठरते. माणूस प्रत्यक्षात जसा आहे, त्यापेक्षा वेगळे रूप दाखविण्याचा प्रयत्न करतो; मात्र त्याच्या वर्तनातील दांभिकता ओळखणे गरजेचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे यांनी केले. डॉ. सुधीर कुंभार यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. अनिल थोरात यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. वंदेमातरम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**नादब्रह्म, अन्नब्रह्म आणि शब्दब्रह्म**
कुलगुरू डॉ. म्हस्के यांनी नादब्रह्म, अन्नब्रह्म आणि शब्दब्रह्म या संकल्पनांचे महत्त्व विशद करताना नादातून मनाला शांती, अन्नातून जीवनाला आधार आणि शब्दांतून समाजाला दिशा मिळत असल्याचे सांगितले. अन्नाचा आदर व भुकेल्याला अन्नदान, विचारपूर्वक शब्दांचा वापर आणि सत्य-विवेकाच्या आधारे संवाद ही सुदृढ समाजाची लक्षणे आहेत. शब्द हे केवळ संवादाचे माध्यम नसून, संस्कार घडविण्याचे आणि समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मनाच्या आरोग्यासाठी आत्मस्वीकार आवश्यक : डॉ. सोनाली खाडे

## 'शोध मनाच्या अस्तित्वाचा' विषयावर दुसरे पुष्प, कमी आत्मविश्वास ही कायमस्वरूपी अवस्था नसते



**कराड (हॅलो न्यूज)**
नकारात्मक विचार, मनावरील ताण आणि कमी आत्मविश्वास यांचा परिणाम आपल्या जगण्यावर होत असतो. मात्र, स्वत:ला समजून घेऊन भावनांचा स्वीकार केला, तर आयुष्य अधिक आनंदी बनवता येते. चुका स्वीकारून त्यातून शिकणे, स्वत:वर प्रेम करणे आणि इतरांबद्दल कृतज्ञता बाळगणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ व संमोहनतज्ज्ञ डॉ. सोनाली खाडे यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या वतीने यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत शोध मनाच्या अस्तित्वाचा या विषयावरील दुसरे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या. यावेळी उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, नगरसेविका नीलम कदम, माजी नगरसेवक सौरभ पाटील, प्रा. बी. एस. खोत, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे आणि सहाय्यक ग्रंथपाल सायली फल्ले उपस्थित होते.

मनाचे स्वरूप उलगडताना डॉ. खाडे म्हणाल्या, की माणसाच्या विचारांवर त्याचे वातावरण, बालपणीचे अनुभव आणि कुटुंबातून मिळालेले संस्कार यांचा प्रभाव असतो. त्यामुळे स्वत:च्या विचारांचे निरीक्षण करून मनातील नकारात्मकता ओळखणे महत्त्वाचे आहे. आपण स्मार्टफोनमधील प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याचा प्रयत्न करतो; मात्र वर्षानुवर्षे वापरत असलेल्या स्वत:च्या शरीराविषयी आणि मनाविषयी पुरेशी जाणीव ठेवत नाही. स्वत:ला समजून घेतल्यास दु:खाची कारणे ओळखून त्यावर मात करता येते. लहानपणी मनावर झालेले संस्कार आणि नकारात्मक अनुभवांमुळे असुरक्षितता, चिडचिड, न्यूनगंड व अपराधीपणाची भावना निर्माण होऊ शकते. कमी आत्मविश्वास ही कायमस्वरूपी अवस्था नसते. स्वत:तील कमतरता स्वीकारून बदलाची सुरुवात केली, तर परिस्थिती बदलू शकते. चुका प्रत्येकाकडून होतात; मात्र त्यातून शिकून त्या दुरुस्त करण्याची तयारी असली पाहिजे. कोणत्या गोष्टींचा किती ताण घ्यायचा, हेही ठरवता आले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजया पवार यांनी केले. ऐश्वर्या पाटणकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला, तर अनिल थोरात यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# सह्याद्रीत आणखी ३० वाघांना पोषक अधिवास! : तुषार चव्हाण

## तारा, चंदा, हिरकणीच्या आगमनाने प्रकल्पात आशादायी चित्र

**कराड (हॅलो न्यूज)**
सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात सध्या दहा वाघांचा अधिवास आहे. मात्र आणखी ३० वाघांना सांभाळण्याची क्षमता या व्याघ्र प्रकल्पात असून, येथील जंगल आणि जैवविविधता वाघांच्या अधिवासासाठी पोषक आहे, असे प्रतिपादन सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक तुषार चव्हाण यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत सह्याद्री व्याघ्र प्रकल्प : वाघांचे पुनरागमन या विषयावरील तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, नगरसेविका नीलम कदम, नगरसेवक प्रवीण पवार, विजय वाटेगावकर, नरेंद्र लिबे, माजी नगरसेवक सौरभ पाटील, फारुख पटवेकर, कोयना वन्यजीव विभागाचे उपसंचालक किरण जगताप, मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे व माजी ग्रंथपाल संजय शिंदे उपस्थित होते.



श्री. चव्हाण म्हणाले, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत विस्तारलेल्या सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र सुमारे १,१६६ चौरस किलोमीटर आहे. सुमारे १८ नद्यांची उगमस्थाने, घनदाट जंगले आणि विपुल जलस्रोत असलेल्या या परिसरात वाघ, बिबट्या, रानकुत्रे, अस्वल, गवा, सांबर व चितळ यांसह विविध वन्यजीव आढळतात.

छत्रपती शिवाजी महाराजांनी वासोटा किल्ला जिंकल्यानंतर त्याला व्याघ्रगड असे नाव दिले. यावरून वाघांचे तत्कालीन अस्तित्व स्पष्ट होते. पुढे इंग्रजांच्या राजवटीतील अनिर्बंध शिकारीमुळे वाघांचे अस्तित्व धोक्यात आले. वनसंवर्धन आणि शिकारीला आळा घालण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे सह्याद्रीत वाघांच्या पुनरागमनाला चालना मिळाली.

प्रास्ताविकात नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी, कराडच्या व्याख्यानमालेची वैचारिक परंपरा अधोरेखित केली. यशवंतराव चव्हाण आणि पी. डी. पाटील यांनी ही परंपरा जोपासल्याचे सांगून निसर्गसंवर्धनासोबत मातीशी नाळ जपण्याचे आवाहन केले. सौरभ पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अनिल थोरात यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

# आव्हानांना भिडा, यश तुमचेच! : सेवानिवृत्त कर्नल समीर कुलकर्णी

## व्याख्यानमालेचे चौथे पुष्प, तरुणांनी संरक्षण दलातील संधींचा लाभ घ्यावा

**कराड (हॅलो न्यूज)**
सैन्यदलात भरती होण्यासाठी उंची, इंग्रजी भाषा किंवा ग्रामीण पार्श्वभूमीचा न्यूनगंड बाळगू नका. आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, एकनिष्ठता आणि कर्तव्याची जाणीव असेल, तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराजांच्या पराक्रमातून प्रेरणा घेऊन तरुणांनी संरक्षण दलातील संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन सामराज अकॅडमी (पुणे)चे व्यवस्थापकीय संचालक तथा सेवानिवृत्त कर्नल समीर कुलकर्णी यांनी केले.

कराड नगरपालिका नगरवाचनालयाच्या ९४ व्या शारदीय व्याख्यानमालेत संरक्षण दलातील संधी आणि आव्हाने या विषयावरील चौथे पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, नगरसेविका नीलम कदम, सुप्रिया खराडे, माजी नगरसेवक सौरभ पाटील, विद्याराणी साळुंखे, विलास जाधव, सेवानिवृत्त अभियंता ए. आर. पवार, राजीव अपिणे, ग्रंथपाल महेंद्र लोखंडे व माजी ग्रंथपाल संजय शिंदे उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाले, सैनिक म्हणजे केवळ शस्त्र हातात घेऊन लढणारी व्यक्ती नव्हे, तर देशाप्रती निष्ठा आणि जबाबदारीची जाणीव असलेला प्रत्येक नागरिक सैनिकवृत्तीचा असतो. सियाचीनमधील उणे ४० अंश, तर राजस्थानमधील ४८ अंश सेल्सिअस तापमानात सैनिक देशाचे रक्षण करतात. युद्धाबरोबरच पूर, भूकंप, त्सुनामी आणि अन्य आपत्तींच्या काळातही ते नागरिकांच्या मदतीला धावून येतात. त्यांच्या त्यागाची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे.

सेवानिवृत्त अभियंता ए. आर. पवार यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन कुमारी ऐश्वर्या पाटणकर यांनी केले. अनिल थोरात यांनी आभार मानले. व्याख्यानास अनेक आजी-माजी सैनिक, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, नागरिक श्रोते उपस्थित होते.

**विमान आणि रणगाडे प्रेरणास्रोत**
यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिसदनाबाहेर भारतीय सैन्यदलातून निवृत्त झालेले विमान आणि रणगाडे ठेवण्यात आले आहेत. ही शस्त्रे पाहून तरुणांना सैन्यदलातील शौर्याची प्रेरणा मिळेल. कराड परिसरातील युवकांनीही तिन्ही सैन्यदलांत उत्कृष्ट कामगिरी करावी, असा विश्वास कर्नल समीर कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

